# परोपकारी संत

प्रकाशित:

०१. वेदांतश्री दिवाळी अंक २०१३ .

०२. अक्षरसिध्दी  दिवाळी अंक २०१३

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# परोपकारी संत

शालेय जिवनात शिकलेल्या व वाचलेल्या संस्कृत सुभाषितांची उजळणी करतांना स्मृति पटलावर अनेक उपदेशकारक सुभाषिते प्रगटली. सुभाषित कारांनी सुभाषिते रचतांना आपले सुविचार प्रगट करित जनमानसातील दैनंदिन जिवनातील गोष्टीचा आधार घेत या सुभाषितांची रचना केली आहे जेणे की, त्यातील भावार्थ त्वरीत लक्षात यावा हा त्या मागचा उद्देश. साधु अर्थात योगी जो काम, क्रोध, मोह, माया, लोभ, आशा–अभिलाषा या सर्व सांसारिक उपभोग्य वस्तूंचा त्याग करित मिथ्या संसारापासून दूर जाउन योग साधनेचा अभ्यास करतो व निस्पृह वृत्तीने कोणतीही आशा आकांक्षा मनी न बाळगता समाजाला मार्गदर्शन करतो तोच खरा परोपकारी साधु परोपकारी संत म्हणावा. साधुची व्याख्या करतांना व खरा साधू कसा ओळखावा असे सांगतांना म्हटले आहे.

शैले शैले न माणिक्यम, मौक्तिकम न गजे गजे|
साधवो नही सर्वत्र, चंदनम् न वने वने ||

अर्थात् ज्याप्रमाणे सागरातील प्रत्येक शिंपल्यामध्ये मोती नसतात. प्रत्येक हत्तीच्या गंढस्थळामध्ये मौक्तिक नसतात. प्रत्येक वनामध्ये चंदनाची झाडे नसतात. त्याप्रमाणे भगवी वस्त्रे परिधान केलेले सर्वच साधू नसतात.

तत्कालीन समाजाकडून संतश्रेष्ठ श्री ज्ञानदेव महाराज व त्यांच्या भावंडांना त्यांच्या माता पित्याबद्दल निंदात्मक टिका सहन करावी लागली. एवढेच नव्हे तर सर्व भावंडाना पाप्याची प्रजा म्हणून अपमान सहन करावा लागला. झालेला अपमान सहन न झाल्यामुळे ज्ञानेश्वर महाराज संतापाने फणफणले, चेहरा लालबुंद झाला, नेत्रातून अंगार बाहेर पडू लागला व रागाच्या भरात त्यांनी स्वतःला कुटिमध्ये कोंडून घेतले. सोपानदेव, मुक्ताबाई व निवृत्तीनाथांनी त्यांच्या अनेक विनवण्या केल्या व रागास आवर घालून बाहेर येण्याची विनंती केली. पण सर्व व्यर्थ. शेवटी मुक्ताबाई श्री ज्ञानदेवांची समजून घालतांना साधूची लक्षणे सांगत म्हणते.

वरि भगवा झाला नामे | अंतरि वष्य केला कामे
त्याला म्हणू नये साधू | जगी विटंबना बाधू
आपणा आपण शोधून घ्यावे | विवेक नांदे त्याच्या सवे

आशा दंभ अवघे आवरा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा

अंतरंगी क्रोध भरला असता केवळ भगवी वस्त्रे परिधान केले म्हणून साधू म्हणू नये. जर मनात काम क्रोध भरला असेल तर त्या भगव्या वस्त्रांचा काय उपयोग. जगात आपली होणारी विटंबना हेटाळणी याचा सारासार विचार करून आपल्या अंतरंगाचा शोध घ्या. राग आवरा. मनातील आशा दंभ दूर करा व आता तरी दार उघडा ज्ञानेश्वरा.

साधूची ओळख सांगतांना असे देखिल म्हटले गेले आहे की,

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले |
तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा ||

समाजात अनेक जण नानाविध व्याधीने, आजाराने ग्रासलेले आहेत. त्यांचे दुःख जाणून त्यांना जो मदत करतो तोच खरा साधू जाणावा.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजीं आपल्या आवडत्या भजनात देखिल हेच सांगतात

" वैष्णव जन तो तेणे कहिए, जो पीड परायी जाणी रे|
पर दुःखे उपकार करे, तोहे मन अभिमानन आणी रे |"

वैष्णव जन अर्थात् विष्णुचा, परमेश्वराचा अवतार. जो दुस-याच्या पीडा, दुस-याचे दुःख जाणून त्याच्या दुःखात सहभागी होऊन संकटकाळी मनात कोणतीही आशा, आकांक्षा, अपेक्षा किंवा अभिमान न बाळगता त्याला मदत करतो तोच खरा परमेश्वराचा अवतार समजा.

संकटकाळी दुस-याला केलेली मदत म्हणजे त्याच्यावर केलेले उपकार यालाच परोपकार संबोधले जाते. परोपकाराची भाषा न करता मदत करणे हे आपले प्रथम आद्य कर्तव्य समजावे. मानवाने संकटकाळी कोणीही पशु, पक्षी अथवा मानव असो त्याची मदत करून मानव धर्म वाढवावा. 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' ही संकल्पना मना मनात रूजवावी. परोपकाराबद्दल नुसते गांधीजीच सांगत नाहीत तर ऋषीमुनींनी निसर्गातील उदाहरणे देत सुभाषिते देखिल लिहून ठेवली आहेत.

अष्टादश पुराणेशु व्यासस्य वचने द्वयम् |
परोपकाराय पुण्याय, पापाय परपिडनम ||

अर्थात् व्यास रचित अठरा पुराणांमधून व्यासांनी दोनच वचने सांगितली आहेत ती म्हणजे, गरजवंतास अथवा पशू पक्षास संकटकाळी वेळेवर केलेली मदत परोपकार ठरतो. परोपकार केल्याने पुण्य मिळते. तर उलटपक्षी दुस-याला त्रास दिल्यास पाप ठरते.

निसर्गात अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या फक्त परोपकारच करतात. परत फेडीची आशा, आकांक्षा किंवा उपकाराची भाषा न करता त्यांचे कार्य अविरत चालूच असते. त्यांच्या पासून परोपकार म्हणजे काय? व परोपकार कसा करावा? हे घेण्या सारखे आहे.

उदाहरणादाखल सांगावयाचे झाल्यास खालील काही संस्कृत सुभाषिते पहा.

परोपकाराय वहन्ती नद्याः|
परोपकाराय दुहन्ती गावः |
परोपकाराय फलन्ती वृक्षाः|
परोपकाराय इदं शरीरं ||

नद्या अविरत वाहत असतात कधी नदीने कोणाला म्हटले का तु माझे पाणी घेउ नको. गायी दुध देतात. गायीचे शेण मलमुत्र देखिल पवित्र मानले गेले आहे. गायीने कधी आपले दुध किंवा मल मुत्र वापरण्यास कोणाला मज्जाव केला आहे का? वृक्ष, तरूवर, लता, वेली गोड फळे देतात छान सुंदर सुगंधित फुले देतात. त्यांनी कधी म्हटले आहे का तु फळे-फुले तोडू नको. हे सर्व करतात ते परोपकाराच्या भावनेने. यात त्यांचा कोणताही स्वार्थ अथवा यामागे परतफेडीची भावना नसते. तत् समान हा मानवी देह देखिल परोपकारासाठीच आहे.

वृक्ष हा सत्पुरूष आहे त्याला सत्पुरूषाची उपमा देत म्हणतात.

छायाम अन्यस्य कुर्वंती तिष्ठंती स्वयं आतपे |
फलान्यपि परार्थाय वृक्षा सत्पुरूषा इव ||

अर्थात् स्वतः आयुष्यभर उन्हात उभे राहून थंडी, वारा, उन, पावसाचा मारा सोसतात. फळे देतात, फुलतात ते पण दुस-यांसाठी. झाडाने स्वतःची फळे स्वतः खाल्लीत असे कधी झाले काय ? झाडाचे फळणे, फुलने हे सर्वस्वी परोपकारासाठीच ना! म्हणुनच वृक्षाला सतपुरूषाची उपमा दिली आहे.

निसर्गाने मानवास भरपूर दिले व देत आहे. नयनास सुखावणा-या सृष्टीसौंदर्यापासून जिवनास आवश्यक हवा, अन्न, पाणी देखिल. अशा निसर्गास परोपकारीसंताची उपमा देणे पण वावगे ठरणार नाही.

अजून एक विचार केला असता असे दिसेल की गाय, म्हैस, बैल, शेळी यासारखी जनावरे जिवंतपणी मानवाची सेवा करतात. गाय, म्हैस, शेळी यांच्या पासून दुध दुभते मिळते. बैल शेतात राबतो व शेतक-याला शेतीला मदत करतो. यांची विष्ठापण पिकासाठी खत म्हणून वापरली जाते तसेच शेण्या थापून इंधनाच्या स्वरूपात वापरली जाते. मरणोपरांत त्यांच्या कातडीचा देखिल वापर मोटेच्या पखाली व वाजविणा-या विविध वाद्यांसाठी केला जातो.

एकंदरित ही जनावरे जिवंतपणी मानवाच्या कामी येतात. एवढेच नव्हे तर मरणोपरांत देखिल उपयोगी पडतात. तसा मानवाचा केवळ ऐच्छिक इंद्रिय दान करण्यापलिकडे फारसा उपयोग होत नाही. तर मानवाने संकटकाळी एकमेकास सहाय्य करून जीवन सार्थकी लावणे यथार्थ होणार नाही का?

संत म्हणतात "जे जे आपणासी ठावे ते ते इतरासी द्यावे। सुज्ञ करून सोडावे सकळ जना॥"

संत उक्ती प्रमाणे आपण देखिल आपणास जे जे ज्ञात आहे ते ज्ञान इतरांना देउन सर्व विश्व शिक्षीत करू या पण परोपकार म्हणून नव्हे तर आपले मानव धर्माप्रति कर्तव्य समजूनच.